## ४थे सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, माळशिरस यांचे न्यायालयात

नियमीत दिवाणी दावा क्र ८८३/२०२२

*राजाराम राघु शिंदे*

वि.

*नारायण कृष्णा शिंदे*

## आदेश निशाणी क्रमांक १० खाली

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी मुळ दाव्यास कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफी करीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांनी असे नमूद केले की, प्रतिवादी यांचे वय ८२ वर्षे असल्याने ते सतत आजारी होते व प्रतिवादी यांना हृयदविकाराचा झटका आल्याने एंजीओप्लास्टी ह्यदची शस्त्रक्रिया शस्त्रक्रीया करावी लागली व त्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने सक्तीची विश्रांती घ्यावी लागली होती. त्यामुळे प्रतिवादीस कोर्टात येवून मुदतीमध्ये दाव्याचे कामी कैफियत देता आली नाही. त्यामुळे कैफियत देण्यास ९ महिने २६ दिवसांचा विलंब झाला आहे. त्यामुळे दिनांक १४/०७/२०२३ रोजी पारीत विना कैफीयतीचा आदेश रद्द होवून मिळावा म्हणून अर्ज.

३. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता दिसून येते की, प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स प्राप्त होवून ते दाव्याकामी हजर झाले परंतू त्यांनी त्यांची कैफीयत ९० दिवसाच्या आत सादर केली नाही. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ८ नियम १ नुसार प्रतिवादी यांच्यावर समन्स बजावल्यापासून ३० दिवसांच्या आत त्यांच्या बचावाची लेखी कैफीयत सादर करतील परंतू उक्त ३० दिवसांच्या मुदतीत लेखी कैफीयत दाखल करण्यास प्रतिवादीने कसुर केल्यास न्यायालयाने विर्निदिष्ट केले असेल अशा अन्य दिवशी ते लेखी कारण नमुद करुन दाखल करता येईल, मात्र असा दिवस समन्स बजावल्याच्या तारखेपासून ९० दिवसांपेक्षा नंतरचा असणार नाही.

४. वरील दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ८ नियम १ ची तरतूद विचारात घेता प्रतिवादी यांना लेखी म्हणणे समन्स प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत दाव्यात दाखल

करणे अपेक्षीत होते परंतू प्रतिवादी यांनी प्रस्तुत दाव्यात दिनांक १३/०९/२०२३ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. अर्ज नि १० वर वादी यांनी म्हणणे दाखल आहे. वादी यांनी प्रतिवादी वरील अर्जावर हरकत घेवून अर्ज कायदेशीर नसल्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

५. प्रतिवादी यांच्या विधीज्ञांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

६. प्रस्तुत प्रकरणाचे आवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचे प्रकरण हे अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकतीमध्ये दोन्ही पक्षकारांचे हित जोपासलेले आहे. त्यामुळे दावा मिळकती संबंधीचे वाद गुणदोषावर अंतिमतः निकाली काढण्याकरीता प्रतिवादी यांना दाव्यात हजर होवून त्यांना लेखी कैफीयत व म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरेल. तसेच त्यांना संधी न दिल्यास ते नैसर्गीक न्यायतत्वाच्या विरुध्द ठरेल. सदर मिळकती संबंधी भविष्यात अनेक दावे टाळण्याच्या दृष्टीने प्रतिवादीना दाव्याच्या कामकाजात सहभागी होण्याची एक संधी देणे संयुक्तीक व रास्त ठरेल. म्हणून आदेश.

**आदेश**

१. नि.क्र. १० वरील प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. लेखी कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. प्रतिवादी यांची दाव्यास कैफियत वाचून नोंदविण्यात येत आहे.

MAHESH NARAYAN PATIL

Digitally signed by MAHESH NARAYAN PATIL
Date: 2023.10.12 15:24:16 +0530

(एम. एन. पाटील)

दिनांक १२/१०/२०२३

४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

माळशिरस

**C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla (Grade III) |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 12 / 10 / 2023. |
| **Order uploaded on** | **:** | 13 / 10 / 2023. |